# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

ग्राहक तक्रार क्र. १७/२००६/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, सह–सचिव,<br>जत तालुका विद्युतधारक असोसिएशन,<br>कै.ह.भ.प.नारायणराव जगताप चॅरीटेबल ट्रस्ट,<br>हॉटेल वृंदावन जवळ, विजापूर रोड,<br>जत–४१६४०४, जि. सांगली. | तक्रारदार |
| **<u>विरूध्द</u>** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु ग्रामीण विभागीय कार्यालय,<br>विश्रामबाग, सांगली<br><br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभागीय कार्यालय,<br>जत, जि. कोल्हापूर<br><br>४) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभाग, संख, ता.जत, जि. सांगली. | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम :–</u>** १) श्री. एम.बी. भाजीभाकरे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र वीज नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व ओम्बुड्समन)
विनियम २००३ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

(अ) ग्राहक गा–हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर मंचाचे अध्यक्ष या पदाचा अतिरिक्त भार असलेल्या पदाचा व या मंचाचा सदस्य–सचिव म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे –

तक्रारदार (१) श्री. दामू नारायण लोहार, (२) श्री. बाबू भोजू लोहार, (३) श्री. इस्माईल कमाल मणेरी, (४) श्री. पांडुरंग बाबू जाधव व (५) श्री. धानाप्पा शिवबसय्या येळदरी, सर्व रा. मु.पो. आसंगी, ता.जत, जि.सांगली, यांचेवतीने तक्रार करणारे श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, जत, जि.सांगली, यांच्या तक्रारीचे स्वरूप असे की,

(१) तक्रारदाराने दि. १३/१२/२००५ रोजी संख, ता.जत, जि.सांगली, येथे घडलेल्या अप्रिय घटनेनंतर कोणत्या कालावधीकरिता, किती उपकेंद्रे व किती ग्राहकांना विद्युत पुरवठा बंद ठेवला होता याचे निश्चितीकरण व्हावे.
(२) इतर उपकेंद्रे चालू केल्यावर संख येथील इतर ११ केव्ही वाहिन्या का बंद ठेवण्यात आल्या होत्या?
(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनियम २००५ अन्वये महावितरण कंपनीला विद्युत पुरवठा करणेस अपयश आल्याने वरील तक्रारदारांचे झालेले नुकसानीचे निश्चितीकरण होऊन त्याची भरपाई व्हावे.

प्रथमत: तक्रारदार यांनी आपली तक्रार विहित नमुन्यात म्हणजेच परिशिष्ट क्ष मध्ये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली येथे दि. १९/१/२००६ रोजी दाखल केलेली आहे. सदर तक्रार निवारण कक्षाकडून योग्य तो समाधानकारक प्रतिसाद न मिळल्याने तक्रादार यांनी आपली तक्रार परिमंडल कर्यालयांर्गत या मंचामध्ये दि. २३/३/२००६ रोजी दाखल केली आहे. वीज नियामक आयोगाच्या तरतूदीनुसार मंचाने तक्रारदार व वीज वितरण व पारेषण कंपनीमधील सर्व संबंधितांना आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २३/५/२००६ रोजी हजर राहण्याचे कळविले. त्यानुसार दि. २३/५/२००६ रोजी सुनावणी झाली. त्यात दोन्ही पक्षकारांनी आपापली बाजू मांडली. ग्राहकाचा व वीज वितरण कंपनीचा सर्व पत्रव्यवहार बघता खालील प्रमाणे तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप आहे.

तक्रारदारांचे असे म्हणणे आहे की, संख तालुक्यामधील ५० गांवे व १२,००० वीज ग्राहकांना विद्युत पुरवठा खंडित झाला. वितरण कंपनीमधील ज्या महापारेषण व महावितरण कंपनीमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे संबंधित गावांमधील लोकांना वीज पुरवठया अभावी त्रास सोसावा लागला व वरील पाच ग्राहकांचे जे नुकसान झाले आहे त्याची वीज नियामक आयोगातील तरतुदीनुसार नुकसान भरपाईचे निश्चितीकरण व्हावे.

वि.प. यांनी वरील बाबीवर आपली बाजू मांडताना असे म्हणाले की, दि १३/१२/०५ रोजी रात्री १०.०० वा. स्थानिक जमावाने ११० केव्ही अतिउच्च दाब उपकेंद्र व नियंत्रण कक्षावर हल्ला करून दगडफेक केली व काचा फोडल्या, फर्निचरची मोडतोड केली व वीज उपकरणांवर दगडफेक केली, निवासस्थानाचे इमारतीवर दगडफेक केली व उकेंद्राचे आवारातील कर्मचा–यांचे वाहन बाहेर नेऊन पेटऊन देण्यात आले. असा प्रकार करून वीज कर्मचा–यांमध्ये भिती व दहशत निर्माण केली यापूर्वीही दोन वेळा अशाच प्रकारे दहशत व विघातक प्रकार घडवण्यांत आले होते. वरील तिन्ही प्रकरणात उमदी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यांत आला आहे.

वरील विघातक व दहशतवादी प्रकार घडल्यामुळे कर्मचारी संघटनांनी दि. १६/१२/०५ रोजी सकाळपासून आंदोलन पुकारल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला होता व त्याचा तपशील सांगितला आहे

११० केव्ही उपकेंद्र महापारेषण कंपनीकडे असल्यामुळे त्वरित त्यांचेशी संपर्क साधून विद्युत पुरवठा पुर्वस्थितीत आणण्याबाबत विनंती फोनवरून केली (तीन उपकेंद्रात सकाळी ७ ते १९ पर्यंत भारनियम होते). त्यानंतर पारेषण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता श्री. पी.एस. माने यांनी सांगितले की, दि. १६/१२/०५ रोजी रात्री ११.३० वा. श्री. के.एस. कवठेकर, कार्यकारी अभियंता(संवव्ु) पारेषण परिमंडल कराड येथून संख उपकेंद्रात आले व त्यांनी प्रथम नियंत्रण कक्षातून जाणा-या सर्व ३३ केव्ही वाहिन्या चालू करण्याचा प्रयत्न केला परंतू तांत्रीक बिघाडामुळे त्या चालू झाल्या नाहीत. स्वीच यार्डमध्ये जाऊन लोकली चालू करण्याचा प्रयत्न केला परंतू त्या चालू झाल्या नाहीत

दि. १७/१२/०५ रोजी सविस्तर पाहणी केल्यावर कांही वाहिन्यांचे तांत्रीक बिघाडाचे कारण समजले ते म्हणजे ब्रेकरमध्ये स्प्रींग चार्ज करणारी मोटारीमध्ये बिघाड होता, तो दुरूस्त करून दुपारी १३.३० वाजेपर्यंत (१) तिकोंडी (२) सोन्याळ (३) बोर्गी या गावांतील लाईन चालू केल्या. ३३ केव्ही संख वाहिनी तांत्रिक बिघाड असल्याने चालू होऊ शकली नाही, सदर वाहिनीची सविस्तर पाहणी करून दुरूस्त करून सायंकाळी १७.३० पर्यंत चालू करून घेतली. ती चालू केल्यावर १७.३५ वा. ११०/३३ केव्ही ट्रान्सफॉर्मर बंद पडला व त्याबरोबर सर्व वाहिन्या बंद पडल्या नंतर पाहणी करून १८.३० वा. ट्रान्सफॉर्मर चालू करून घेतला व एक-एक करून तिकोंडी, सोन्याळ व बोर्गी लाईन चालू करून घेतल्या. संख वाहिनीत बिघाड असल्यामुळे चालू झाली नाही. दि. १८/१२/०५ रोजी सकाळी ८.०० वा. संख वाहिनी चालू करण्यात यश आले, असे वि.प. यांनी सुनावणीच्यावेळी सांगितले आहे व तसेच तक्रारदार व वि.प. यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहे.
वरील सर्व बाबींचा विचार करता व वीज नियामक आयोगातील तरतुदीच्या आधारे व या मंचाचे अध्यक्ष व सदस्य-सचिव या दोन्ही पदाचा असलेल्या मताच्या आधारे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>(ब) ग्राहक गा-हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर मंचाचा सदस्य म्हणजेच ग्राहक प्रतिनिधी म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे -</u>

वरील तक्रारीमधील सर्व नोंदी बरोबर असल्याने मी मंचाच्या सदस्य या नात्याने सहमत आहे. तथापि नुकसानभरपाई मागणी विनियम २००५ मधील कलम १७.१ व १७.३ ने नाकारली आहे त्यास मी सहमत नाही.

दंगाधोपा, वीज वितरण कंपनीचे नुकसान, दगडफेक इ. हे अयोग्य आहे. दंगलखोरांना शासन होणे गरजेचे आहे. तथापि नुकसान करणार वेगळे व प्रत्यक्षात नुकसान भोगणार वेगवेगळ्या ग्रामीण भागातील ग्राहक. तांत्रिक बिघाड अगर नैसर्गिक आपत्ती यावेळी १७.१ व १७.३ कलम योग्य आहे. दगडफेक का झाली ? दगडफेक झाली, जमावाने दहशत निर्माण केली म्हणून कर्मचा-यांनी अचानक संप केला काय ? पत्रव्यवहारात उल्लेख केल्याप्रमाणे रोहित्रामध्ये बिघाड की वाहिनीमधील तांत्रिक बिघाड हा प्रश्न उभा राहतो ? पारेषण कंपनीकडून पुरवठा न झाल्यामुळे वितरण कंपनी ग्राहकांना वीज देऊ शकली नाही हे योग्य आहे. इतक्या मोठया प्रमाणात बिघाड होऊनही पारेषण कंपनीतून एकच अधिकारी कार्यकारी अभियंता श्री कवठेकर हे उपस्थित होतात पण त्यांच्याकडे मेटेनन्ससाठी लागणारे साहित्य(टी ॲन्ड पी) उपलब्ध नसल्याची नोंद खेदजनक आहे. वीज वितरण कंपनीने पुरवठा सत्वर चालू व्हावा म्हणून कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे पारेषण

कंपनी अथवा वीज वितरण कंपनीचे स्थानिक कर्मचारी यांच्यातील कार्यपध्दत व समाजकंटकांची अशोभनिय कृती यामुळे व उपकेंद्रातील ग्रामीण ग्राहकांना संकटाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे अर्जदारांनी केलेली नुकसान व भरपाई मागणी योग्यच आहे.

दिनांक १३/१२/२००५ रोजी रात्री १० चे सुमारास संख उपकेंद्रावर दगडफेक व जाळपोळ केली व प्रत्यक्षात दि. १६, १७, १८ व दि. १९/१२/२००५ रोजी पुरवठा बंद केला पारेषण व वितरण कंपनीतील लोक दहशतीमुळे अचानक संपावर गेल्याचे नमुद केले आहे. तसेच सर्वत्र एकदमच तांत्रिक बिघाड झाल्याचे नमूद केले आहे. पारेषण कंपनीकडून वीज वितरण कंपनीला वीज पुरवठा कांहीही कारण न देता बंद केल्यामुळे ग्राहकांचे नुकसान झाले आहे व त्यांची नुकसान भरपाई मागणी योग्य आहे.

या मंचाला दिलेल्या विहीत मुदतीत म्हणजेच ६० दिवसांची कालमर्यादा पूर्ण होऊनही निर्णय होऊ शकला नाही कारण पारेषण कंपनी, वितरण कंपनी व वीज नियामक आयोग यांच्याकडील पत्रव्यवहारामळे निर्णयास विलंब झालेला आहे

वरील सर्व बाबींचा विचार करता मंचाने खालील निर्णय बहुमताने मंजुर केला आहे.

# आदेश

१) दि. /१३/१२/०५ रोजी आक्रमक जमावाने उपकेंद्रावर हल्ला व दगडफेक केली त्याचा परिणाम स्वरूप कर्मचारी संघटनांनी पुकारलेल्या आंदोलन, उपकरणातील बिघाड या घटना महावितरण व महापारेषण कंपनीच्या नियंत्रणा बाहेरील असल्यामुळे व आकस्मिक घडल्यामुळे महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५, कलम १७.१ व १७.३ नुसार कोणतीही नुकसान भरपाई देता येणार नाही व त्याची निश्तिीकरण करता येणार नाही

२) प्रस्तुतचा निर्णय तक्रारदार यांना मान्य न झाल्यास त्यांना या आदेशाचे तारखेपासून ६० दिवसांचे आत लोकपाल (ओम्बुडस्मन) मुंबई यांचेकडे दाद मागता येईल. तसेच वि.प. यांना सदरचा निर्णय अमान्य झाल्यास त्यांना मा. ना.उच्च न्यायालय, मुंबई अथवा दिवाणी न्यायालयात दाद मागता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

(एम.बी.भाजीभाकरे)
सदस्य – सचिव
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर